**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (National Rural Livelihoods Mission) (NRLM) रुपांतर करुन ते राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (State Rural Livelihoods Mission) (SRLM) स्वरुपात राज्यात राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक: एनआरएलएम -२०११/प्र.क्र.१९६/योजना-३**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक : १८ जुलै, २०११.**

**पार्श्वभूमी**

केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांसाठी **एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम** हा एकमेव **स्वयंरोजगार** कार्यक्रम होता. त्यामध्ये ग्रामीण क्षेत्रातील **महिला व बालविकास** (डवाक्रा), ग्रामीण भागातील पारंपारिक कारागिरांना सुधारित हत्यार संच पुरविणे (सिट्रा) गंगा कल्याण योजना (जीकेवाय) यासारख्या अनेक संलग्न कार्यक्रमाची भर घालण्यात आली. मात्र, या प्रत्येक कार्यक्रमाकडे **स्वतंत्र** कार्यक्रम म्हणून पाहिल्यामुळे त्याची परिणिती कार्यक्रमनिहाय उद्दीष्ट्ये साध्य करण्यात झाला, एकात्मिक दृष्टीकोनाचा त्यात अभाव जाणवला. या स्थितीत सुधारणा करण्यासाठी स्वयंरोजगार कार्यक्रमाचे स्वरुप बदलून एप्रिल, १९९९ पासून, केंद्र शासनाने दारिद्रय निर्मूलनासाठी **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** (एसजीएसवाय) हा पतकर्ज- नि-अर्थसहाय असा नवीन कार्यक्रम सुरु केला. हा सर्वांगीण कार्यक्रम असून त्यामध्ये स्वयंसहायता गटांद्वारे दारिद्रय रेषेखालील स्वरोजगारींचे संघटन, प्रशिक्षण व कौशल्यवृध्दी, पतकर्ज, तंत्रशास्त्र, मुलभूत सुविधा आणि **पणन** यासारखे पूरक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आले, जेणेकरुन ग्रामीण कुटुंबांचा आर्थिक विकास होऊन, त्यांचे सातत्यपूर्वक उत्पन्न वाढून ते दारीद्रय रेषेच्या वर येतील. सदर योजना केंद्र शासन ७५% निधी व राज्य शासन २५% निधी पुरस्कृत आहे. स्वरोजगारींचे स्वयंसहायता गट करण्यास प्राधान्य देऊन त्यांना प्रशिक्षण, अनुदान, मुलभूत सुविधा आणि बँकेकडून कर्ज देऊन त्यांना उपक्रम सुरु करण्यास उद्युक्त करणे, जेणेकरुन या कुटुंबाचे प्रति मासीक उत्पन्न किमान रु.२०००/- होऊन ते दारिद्रय रेषेच्या वर येतील, अशी संकल्पना आहे.

**२.** या योजनेचे केंद्र शासनाने विविध संस्थांकडून मुल्यमापन केले असता सदर योजना दारिद्रय निर्मूलनासाठी काही अंशी यशस्वी ठरली असली तरी अजूनही मोठया प्रमाणावर दारिद्र रेषेखालील कुटुंबांचे **सक्षमीकरण** करुन त्यांना आर्थिक कार्यक्रमाद्वारे सातत्यपूर्ण उत्पन्न प्राप्ती होणे आवश्यक आहे, असे निष्पन्न झाल्याने सध्याच्या योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीच्या मर्यादा जाणवू लागल्या आहेत. सध्याच्या योजनेतील खालील ठळक उणिवा केंद्र शासनाच्या निदर्शनास आल्या :-

(अ) गटाची **नोंदणी** झाली, परंतु **बांधणी आवश्यक तेवढया प्रमाणावर झालेली नाही.** राज्यात सन २००२ च्या दारिद्रय रेषेच्या सर्वेक्षणानुसार सद्य:स्थितीत एकूण **४५ लाख** कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. मात्र, मार्च २०११ पर्यंत एकूण २.५५ लाख स्वयंसहायता गट तयार करण्यात आले. त्यातून सुमारे २५.५० लाख कुटुंबे संघटीत झाली. अद्यापि, १९.५० लाख कुटुंबांच्या एकूण १.९५ लाख स्वयंसहायता गटांची बांधणी करावयाची उद्दीष्ट बाकी आहेत .

(ब) गतगर्ता दर (ॲट्रीशन रेट) अतिशय जादा असून राज्यामध्ये जानेवारी, २०११ पर्यंत **वर्गवारी-१** पार केलेले एकूण गट १.७९ लाख इतके आहेत. **वर्गवारी-२** पार केलेले गट ९९५११ इतके आहेत. तथापि, त्यापैकी ७५६१९ गटांनी आपले आर्थिक उपक्रम सुरु केले आहेत. या मागे महत्वाचे कारण असे दिसून आले की, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना, शासन यंत्रणेच्या पुढाकाराने, लघुवित्त पुरवठा करुन थेट उद्योजक बनविण्याचे उद्दिष्ट एकाच टप्प्यात अंमलात आणणे, हे अव्यवहार्य आहे. गरिबांच्या लहान-सहान कौटुंबिक, सामाजिक गरजांची आर्थिक पुर्ती गरिबांच्या, गरिबांनी, गरिबांसाठी संघटीत केलेल्या संस्थांत्मक यंत्रणेमार्फत करुन व अशाप्रकारे त्यांच्या परस्पर सहाय्याची शाश्वत संस्थीय प्रणाली विकसीत करुन, त्यायोगे त्यांची क्षमता वाढवून, त्यांच्यात बचतीची सवय वाढवून, परस्पर समन्वयाने आपत्ती निवारण करुन वित्तीय संस्थांकडे याद्वारे त्यांची पत विकसीत करुन, सावकारी जाचातून मुक्त होण्याची परिस्थिती निर्माण करुन नंतर त्यांना विविध आर्थिक पूरक उद्योग देणे आवश्यक आहे. दुसरीकडे बँकांचे एकूण धोरण, त्यांचेकडील या योजनेसाठीचा कमी कर्मचारीवृंद, जागृतिचा अभाव व काही बँकांची या योजनेकडे व्यवसाय म्हणून न बघण्याची प्रवृत्ती, यामुळे पुरेसे निधीसहाय्य होऊ शकत नाही.

(क) सक्षम संस्थांत्मक व्यवस्था व मुलभूत सुविधांचा व योग्य प्रशिक्षकांचा अभाव, अस्तित्वात असलेल्या संस्थांची मर्यादित क्षमता आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांपर्यंत पोहचण्याची त्यांची सिमीत कुवत आणि योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्व घटकांचे एकछत्रीकरण यांचा अभाव.

(ड) योजना गटसमुहाला प्राधान्य देणारी असून या गटसमुहांचे संघीकरण होणे आवश्यक आहे. तथापि, संघिकरणाची प्रक्रिया अत्यंत कमी प्रमाणात आहे.

(इ) स्वरोजगारींचे स्वाथ्य, सामाजिक सुरक्षा (Social Security) व त्यांच्या साधनसामुग्रीची जबाबदारी घेण्यासाठी विम्याच्या किंवा तत्सम संरक्षण पर्यायाबाबत अत्यंत अल्प प्रमाणात कार्यवाही झालेली आहे.

(फ) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे या योजनेकरिता स्वतंत्र व व्यावसायीक कर्मचारीवृंद नसल्याने आणि सद्य:स्थितीत असलेला कर्मचारीवृंद अन्य योजनांच्या अंमलबजावणीच्याही कामामध्ये व्यस्त असल्याने या योजनेकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. विशेषत: तालुका व ग्राम पंचायत स्तरावर ही उ णीव प्रकर्षाने भासते.

(ग) ग्रामीण भागातील दारिद्र्य मोठया प्रमाणात अनुसूचित जाती/जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक प्रवर्गात आहे. मात्र, त्यांच्या व्यथांची जाणीव होण्यासाठी आवश्यक व्यवस्था नाही. दारीद्र्य रेषेखालील कुटुंबांची निवड करताना हे घटक डावलल्याचे व प्रभावी घटकांनी आपली नावे नोंदविल्याचे दिसून येते. तसेच हा वर्ग सद्य:स्थितीत असलेल्या औपचारिक व्यवस्थेशी अपरिचीत राहिला आहे. स्वयंसहायता गट ,त्यांचे उपक्रम, या उपक्रमाद्वारे होत असलेली उत्पादने, याबाबतच्या माहितीचा अभाव तसेच त्यांचेवरील जबाबदाऱ्यांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे स्वरोजगारींच्या गटांच्या स्थापनेपासून ते त्यांचे लघुउद्योग सुरु करेपर्यंतच्या पातळीपर्यंतची आणि निधी स्त्रोताच्या व्यवस्थेची माहिती एकत्र करणे आवश्यक आहे.

(ह) बाजारपेठेत यशस्वी होण्याची प्रचंड क्षमता असूनही स्वयंसहायता गटांकडून उत्पादीत माल व सेवा यात **निम्न मूल्य वर्धन** (Low Value Addition), **दर्जा** (Grade), **प्रत** (Quality), **वैविध्याचा अभाव**, (Lack of Variety), परंपरागत उत्पादनाच्या पलिकडे जाण्याची उदासिनता, पॅकींग व ब्रॅडींगचा अभाव, मोठ्या उद्योग घटकांशी साखळी निर्मितीचा अभाव अशा त्रुटी दिसून आल्या.

**राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियान स्वरुप व महत्वाचे घटक**

**३.** दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबामध्ये **कार्यक्षमता** असते व दारिद्र्यातून बाहेर येण्याची त्याची **तीव्र इच्छा** असते मात्र, या क्षमतावृध्दीसाठी व इच्छापुर्तीसाठी त्यांना ज्या प्रक्रियेतून जाणे आवश्यक आहे, ती परिपूर्ण होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे उद्दीष्ट कायम ठेवून या योजनेचे, यासाठीच, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान **(National Rural Livelihoods Mission) (NRLM)** मध्ये रुपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महाराष्ट्र राज्यासह १२ राज्यांना केंद्र शासनामार्फत जागतिक बँकेचे सहकार्य सुध्दा या अभियानातील काही महत्वाच्या घटकांसाठी प्राप्त होणार आहे. सदर अभियानाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे:-

**३.१ अभियानाचे उद्दीष्ट :-**

दारिद्र्य निर्मूलनासाठी दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींची क्षमता वाढविण्यासाठी तळागाळापासून भक्कम **संस्थीय प्रणाली** स्थापन करुन त्याद्वारे दारिद्र्य निर्मूलन करणे. या संस्था दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींनी, व्यक्तींच्या, व्यक्तीकरिता स्थापीत केलेल्या असतील व दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींना लाभदायक क्षमतावृध्दी, स्वरोजगार व कौशल्य आधारीत रोजगाराच्या (वेतनी व स्वयंरोजगाराच्या) संधी उपलब्ध करुन देतील, जेणेकरुन त्यांच्याकडे शाश्वत रोजगार साधन उपलब्ध होऊन त्यांचे कायमस्वरुपी उत्पन्न वाढेल.

**३.२ अभियानातील महत्वाचे घटक :-**

(i) **संवेदनशील सहाय्य संरचना :-**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये स्वतंत्र (Independent) **समर्पीत (डेडीकेटेड) व संवेदनशील (सेन्सेटीव्ह) कर्मचारीवृंदांचा** अभाव लक्षात घेऊन अशी संवेदनशील व समर्पीत सहाय्य संरचना राष्ट्रीय, **राज्य, जिल्हा, तालुका** व क्लस्टर पातळीवर निर्माण करणे, जिल्हा पातळीवरील घटक हा उपक्रमाच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्रपणे व पूर्णवेळ कार्यरत राहून तो जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी तसेच पंचायतराज्य संस्थांशी समुचीत पध्दतीने समन्वीत व संलग्न असेल.

**यासाठी शक्यतो कायम स्वरुपी व्यवस्था निर्माण करण्यात येणार नसून आवश्यक त्या सर्व व्यावसायीक सहाय्यासाठी प्रतिनियुक्तीवर किंवा करारपध्दतीने किंवा सीबीओमार्फत अथवा बाहय स्त्रोताद्वारे (Out Sourcing) सेवा उपलब्ध करुन घेण्यात येईल.**

(ii) **सर्वसमावेशक सामाजिक सहभाग :-**

दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबातील किमान १ सदस्य, विशेषतः महिला स्वयंसहायता गटामध्ये समाविष्ट होईल. याबाबत मागणी आधारीत पध्दतीने कालबध्द कार्यवाही करण्यात येईल आणि गट सक्षम व विविध यंत्रणांशी, संस्थांशी व संधीय प्रणालीशी निगडीत होईल, यासाठी ठोस प्रयत्न करण्यात येतील. अखेरीस उपजिवीकेच्या पुर्ततेसाठी उत्पादक गट, सेवापुरवठा गट, शेतीजन्य गट याद्वारे एकत्रित करण्यात येईल.

(iii) **दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींच्या संस्थांचे उन्नतीकरण** :-

दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या संस्था जसे स्वयंसहायता गट, त्यांचे गावस्तर, जिल्हापरिषद मतदारसंघस्तर, गटस्तर (ब्लॉक), जिल्हा, इ. पातळीवर संघ (Federation) स्थापून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे बाहय एजन्सीवरील अवलंबन कमी व्हावे, सर्व कामकाज संघीय प्रणालीद्वारे व्हावे यासाठी संघटीत करण्यात येईल. सामाजिक व आर्थिक सेवा तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी या संघीय संस्था शासन, पंचायतराज संस्था, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राशी अनुरुप भागीदारी व समन्वय करतील.

(iv) **मागणी आधारीत योजना** :-

या अभियानामध्ये **"मागणी आधारीत योजना"** ही संकल्पना आहे. म्हणजे गावापासून राज्य स्तरापर्यंतचे संघटन, व्यवस्थापन, अंमलबजावणी प्रणाली गरीबांच्या गरजांच्या पूर्ततेसाठी स्वयंप्रेरणेतून निर्माण होईल. शासन यंत्रणा सहाय्यकर्त्याची भुमिका बजावेल. दारिद्र्य कमी करावयासाठी राज्याने विकसीत करावयाच्या कृती आराखडयात ७ वर्षासाठीचा परस्पेक्टीव्ह प्लॅन अंतर्भूत आहे. हे सविस्तर प्लॅन प्रतिवर्षात विभागून अंमलात आणण्यासाठी आणि गरजेनुसार त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यासाठी अभियानामध्ये लवचिकता ठेवण्यात आली आहे.

(v) **प्रशिक्षण व क्षमता बळकटीकरण** :-

दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींच्या संस्था, जीवनमान, पतव्यवस्था, यांचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी **व्यवस्थापकीय प्रशिक्षण** आणि रोजगार व स्वयंरोजगार सक्षमतेने करण्यासाठी **कौशल्य विषयक प्रशिक्षण** देण्यात येईल. व्यावसायिकांची, रोजगारांची, स्वयंसहायता गटांची व त्यांच्या संघांची क्षमता बांधणी करण्यासाठी विशेषत्वाने लक्ष पुरविले जाईल.

(vi) **फिरता निधी व भांडवली अनुदान** :-

फिरता निधी व भांडवली अनुदान या स्वरुपात अनुदान उपलब्ध असेल. स्वयंसहायता गटांना त्यांच्या स्वबचतीशिवाय वित्तीय संस्थांकडून खेळता निधी व **पतपुरवठा** आणि त्यांच्या तात्काळ गरजा भागविण्यासाठी शासनाकडून **फिरता निधी** दिला जातो. अभियानांतर्गत देण्यात येणारे **भांडवली अनुदान** निरंतरस्त्रोत म्हणून असेल आणि ते लाभार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाच्या बँक पतपुरवठयासाठी **उत्क्रांतीमय भांडवल (Catalytic Capital)** म्हणून वापरण्याची, म्हणजेच भांडवली अनुदान हे पतपुरवठयासाठी पत म्हणून आणि बँकेकडून मिळणाऱ्या आवर्ती पतपुरवठयाच्या संबंधात सक्षम ठरेल. दारीद्र्य रेषेखालील कुटुंबांना पतपुरवठा वारंवार आवश्यक असतो. बँकेचे व कुटुंबाचे संबंध दीर्घ कालावधीकरीता राहून त्यांना दारीद्र्यरेषेच्या वर येईपर्यंत गरजेनुसार पतपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी बँकांची त्यांचेप्रती विश्वासार्हता वाढावी यादृष्टीने या भांडवली अनुदानाचा उपयोग, बचतगट अथवा त्यांचे संघीय व्यवथेकडून करण्यात यावा, असे अपेक्षित आहे. या अनुदानाचा उपयोग बँकांनी पतपुरवठा करावा म्हणून व बचत गटांनी / कुटुंबांनी पतपुरवठयाचा सुयोग्य वापर करुन परतफेड करावी म्हणून प्रोत्साहन अनुदान/व्याज अनुदान किंवा इतर अभिनव पध्दतीने वापर होणे अपेक्षित आहे.

(vii) **सर्व समावेशक आर्थिक अंतर्भाव (Universal Financial Inclusion ) :-**

अभियानांतर्गत दारिद्रय रेषेखालील स्वरोजगारींना त्यांच्या स्वयंसहायता गटांना व संघांना बँकींग सेवा मिळत आहे. परंतु केवळ बँक खाते उघडण्यापूरती बँकींग सेवा सिमीत न ठेवता **त्यापलिकडे जाऊन वैश्विक आर्थिक अंतर्भाव साध्य करण्यात येईल.** सर्व प्रकारची आर्थिक गरज व पुरवठा बँक प्रणालीतून प्राप्तीसाठी अभियानांतर्गत तरतूद करण्यात येईल. तसेच जीवनरक्षा, आरोग्य आणि साधनसंपत्ती या गरजांना विमा योजनेद्वारा संरक्षण देण्यासाठी विशेषत्वाने पुढाकार घेतला जाईल.

(viii) **व्याजदरासाठी अनुदान :-**

वर क (vi) मध्ये नमूद केल्याप्रमाणे परवडणाऱ्या कमी व्याजदराने दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना त्यांच्या उपक्रमाच्या स्थैर्यासाठी व ते शाश्वत उत्पन्न स्त्रोत म्हणून विकसीत होण्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा (Multiple Dosage ) कर्ज मिळणे ही त्यांची अत्यंतीक गरज आहे. त्यासाठी त्यांना कर्ज परवडावे म्हणून द.सा.द.शे.७% वरील व्याजासाठी किंवा शासन वेळोवेळी ठरवील त्यानुसार अनुदान देण्यात येईल. सुरुवातीला सदर अनुदान हे रु.१.०० लाखापर्यंतच्या वारंवार घेतलेल्या कर्जावर अनुज्ञेय राहील

(ix) **मुलभूत सुविधा निर्मिती व विपणन सहाय्य :-**

या अभियाना अंतर्गत जिवन्नोनती उपक्रमासाठी आवश्यक असलेल्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून व्यवसायीक प्रशिक्षण व विपणनासाठी आवश्यक मुलभूत सुविधा निर्माण करण्यात येतील. विशेषतः स्वयंसहायता गटांना विपणन सहाय्य, ज्यामध्ये बाजार संशोधन, बाजारासाठी तांत्रिक क्षमता, त्यांचा विस्तार व सुधारणा याकडे जास्त लक्ष देण्यात येईल.

(x) **अन्य योजनांचे एकत्रिकरण व समन्वय :-**

ग्रामीण विकास मंत्रालय, अन्य मंत्रालय तसेच राज्य शासनाच्या विकासात्मक योजनांची जुळणी व एकत्रिकरण (Convergence/ Integration) या अभियानांतर्गत करण्यात येईल.

(xi) **कौशल्यवृध्दी तसेच नोकरी देणारे प्रशिक्षणाचे विशेष प्रकल्प :-**

बाजारात मागणी असलेल्या बाबींवर प्रशिक्षण देऊन तरुणांना नोकरी मिळवून देणे, स्वरोजगारासाठी कौशल्य प्राप्त करुन देणे, ही एक महत्वाची गुंतवणूक ठरेल. एकूण नियतव्ययाच्या **१५% नियतव्यय** याबाबीसाठी खर्च केला जाईल.

(xii) समाजाधिष्ठित संघटने**(Community Based Organisation)बरोबर भागिदारी:-**

सदर अभियान समाजाधिष्ठित संघटने**(Community Based Organisation)** बरोबर कार्यपध्दती व अंमलबजावणी या स्तरावर भागिदारी करण्यासाठी कार्यपध्दती विकसीत करेल. सदर भागिदारी ही या अभियानातील मुल्यांबाबत मार्गदर्शन करेल. तसेच संघीय व्यवस्थापन प्रणालीसाठी आवश्यक मनुष्यबळ कालांतराने अंतर्गत क्षमता वृध्दी करुन बचतगटांचे घटकातूनच उपलब्ध करुन घेऊन त्यांचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात करण्याचे धोरण अवलंबण्यात येईल. समूह साधन व्यक्ती ( Community Resource Persons) ही संकल्पना कार्यान्वित करुन तिचा उपयोग बाह्य व्यवस्थापन यंत्रणेचा पर्याय म्हणून विकसित करण्यात येईल.

(xiii) **पंचायत राज संस्थांशी समन्वय** :-

दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या या अभियानांतर्गत विकसीत संस्था व पंचायती राज संस्था यांचे संबंध, विशेषतः ग्राम पातळीवरील संबंध महत्वाचे आहेत. या दोन्ही संस्थांमध्ये कोणत्याही प्रकारचा विसंवाद होणार नाही याची काळजी घेतली जाईल. यासाठी स्थानिक पातळीवर परस्पर सल्ला, सहाय्य व उपलब्ध साधन सामुग्रीचा एकात्मीक उपयोग केला जाईल. पंचायत राज संस्था, अभियान व्यवस्थेला दारिद्र्य निर्मूलनाच्या कामासाठी पूरक मार्गदर्शक म्हणून कार्य करेल.

(xiv) **नाविन्यपूर्णता (Innovations)** :-

यशस्वी कार्यपध्दती विकसीत करणे ही दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या मार्गावरील महत्वाचे वळण आहे. यासाठी नाविन्यपूर्ण पध्दती विकसीत करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. यावर एकूण नियतव्ययाच्या ५% नियतव्यय खर्च केला जाईल.

(xv) **केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयातून तांत्रिक सहाय** :-

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी या हेतूने केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयातून संस्थांची निर्मिती व त्यांचे बळकटीकरण यासाठी तांत्रिक सहाय्य पुरविले जाईल. सदर सहाय्य दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या संस्था आणि बँक क्षेत्र, खाजगी व सार्वजनिक क्षेत्र, यांचेशी सहयोग करण्यासाठी तसेच तळागाळातील गरीबातील गरीब (Poorest of the Poor) व्यक्तींपर्यंत पोहचण्यासाठी सहाय्यभूत होईल. अभियानांतर्गत राष्ट्रीय स्तरावर विशेषज्ञ, सल्लागार व **पेशेवर** (Professionals) व्यक्तींचा समूह गट (पूल) तयार करण्यात येईल. त्यामध्ये संस्था बांधणी, सूक्ष्म पतपुरवठा, उपजिविका व नोकरी देणारे कौशल्यवृध्दी प्रशिक्षण इ.चा सहभाग असेल. या पूलमधून राज्यस्तरावरील अभियानात विकासासाठी व राज्यातील दारिद्र्य निर्मूलनाची कार्यपध्दती विकसीत करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सहाय पुरविले जाईल.

(xvi) **संनियंत्रण** :-

सदर अभियानाचे व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे वेबसाईटवरुन, कार्यमुल्यमापन समिती यांच्या नियमीत बैठका घेऊन, क्षेत्रिय अधिका-यांच्या प्रत्यक्ष भेटी, सामाजिक लेखापरीक्षण याद्वारे संनियंत्रण केले जाईल. यामुळे प्रक्रिया संनियंत्रणाचा (Process Monitoring) अभ्यास होऊन प्रभावी अंमलबजावणी व पारदर्शकता निर्माण होईल.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात करण्याच्या निर्णयानुसार राज्यात **राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान** (State Rural Livelihood Mission - SRLM) सन २०११-१२ पासून राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :-

**१.** या अभियानासाठी दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची सामाजिक जाणीव जागृत करणे आणि स्वयंसहायता गटांचे, गटांच्या संघांचे, पेशेवर समुहाचे व सहाय्यकारी व्यक्तींच्या समुहाचे संघटन विकसीत होणे हे कार्य दीर्घकालीन प्रक्रियेचे आहे. यासाठी सुरुवातीला कालावधी लागेल व

नंतर गुणोत्तर (Exponential) पध्दतीने वाढ होईल. अंतिमत: सदर कार्यक्रम हा जनकार्यक्रम होऊन शासकीय यंत्रणेद्वारे चालविलेला कार्यक्रम असे त्याचे स्वरुप राहू नये यासाठी सदर अभियानात गटांचा (Blocks) व जिल्ह्यांचा (Districts) टप्प्याटप्प्याने अंतर्भाव करण्यात येईल.

२. प्रथमत: प्रत्येक महसूल विभागामध्ये सर्वात कमी मानवी निर्देशांक असलेला **एका जिल्ह्यातील काही ब्लॉक** भागात (Clusters)व ग्रामपंचायतीत हे अभियान सुरु करण्यात येईल. अशा ब्लॉकला **संवेदनशील (इंटेन्सीव) ब्लॉक, क्लस्टर व ग्रामपंचायती** संबोधण्यात येईल.

३. पहिल्या टप्प्यात **(१) रत्नागिरी (२) नंदूरबार (३) सोलापूर (४) जालना (५) यवतमाळ व (६) गडचिरोली** या जिल्ह्यांतील ठराविक ब्लॉकमधील काही ग्रामपंचायत समूहात (Clusters) राबविण्यात येईल. राज्याची मोठे भौगोलिक क्षेत्र विचारात घेऊन पहिल्या टप्प्यात राज्यातील इतर कमी मानवी निर्देशांक असलेले जिल्हे तसेच याप्रकारचा प्रकल्प राबविण्यासाठी स्वत:हून पूर्वतयारी केलेले आणखी काही जिल्हे केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या पूर्व परवानगीने अंतर्भूत करण्यात येतील.

४. मात्र वरील क्र.३ मध्ये नमूद जिल्ह्यांशिवाय इतर जिल्ह्यातील काही ठराविक ग्रामपंचायतीमध्ये (३ ते ५) सुध्दा तो पायलट पध्दतीने या प्रक्रियेची तपासणी करण्यासाठी व पुढे चालून हा प्रकल्प त्या जिल्ह्यात सुरु करतांना आधारभूत/प्रमाणभूत म्हणून राहण्यासाठी कार्यान्वित करण्यात येईल. यासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत जिल्ह्यासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात जो नियमित निधी प्राप्त होणार आहे, त्या निधीच्या प्रशिक्षण, मुलभूत सुविधा अंतर्गत स्त्रोताव्दारे उपलब्ध निधीतून हा खर्च करण्यात यावा. मात्र हे जिल्हे पुढे अभियानात अंतर्भूत झाल्यावर त्यांच्यासाठी सुध्दा अभियानातून तरतूद करण्यात येईल. तोपर्यंत ग्रामपंचायतीत पायलट संबंधित जिल्ह्यांना त्यांचा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमार्फत राबविण्यासाठी मुभा राहील.

ज्या तालुक्यांचा/गटांचा अंतर्भाव प्रथम टप्प्यात अभियानात झालेला नाही, त्यामध्ये सध्याच्या SGSY च्या कार्यक्रमातील गुणवत्तेची गतिमानता वाढवून व त्यांचे संघांशी जोडणीचे बळकटीकरण करण्यावर ते या अभियानात अंतर्भूत होईपर्यंत भर दिला जाईल.

**५. निधी -स्त्रोत संरचना :-**

**राष्ट्रीय ग्रामीण जिवन्नोनती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असून त्यामध्ये केंद्र हिस्सा ७५% व राज्य हिस्सा २५% असेल.** केंद्र नियतव्यय राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या प्रमाणात ठरविण्यात येईल. तसेच जागतिक बँक सहाय्यीत राज्यामध्ये महाराष्ट्राचा समावेश केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने केला असल्याने केंद्रामार्फत काही बाबीकरिता आवश्यक निधी प्राप्त होईल. तथापि, यासाठी काही विशेष बाबींमुळे अधिक निधीची आवश्यकता असल्यास, गरजेनुसार विचारात घेण्यात येईल.

या अभियाना अंतर्गत द्यावयाचे अर्थसहाय्य मर्यादा व प्रमाण सुरुवातीला खालीलप्रमाणे असेल :-

| अ.क्र. | कार्य | वित्तीय मर्यादा/प्रमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | गटबांधणी | रु.१०,०००/- प्रती गट |
| २ | फिरता निधी | गटांनी जमा केलेल्या एकूण निधी इतका मात्र, किमान रु.१०,०००/- व कमाल रु.१५,०००/-प्रती गट. |
| ३ | भांडवली अनुदान | प्रती लाभार्थी सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु.१५,००० /- व अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गासाठी रु.२०,०००/- याप्रमाणे स्वयंसहायता गटास रु.२.५० लाख कमाल मर्यादेपर्यंत. याचा उपयोग Seed Capital म्हणून करणे. (परि.३(२)(vi) प्रमाणे. |
| ४ | क्षमता बांधणी व कौशल्यवृध्दी प्रशिक्षण | रु.७,५००/- प्रती लाभार्थी |
| ५ | व्याजदर अनुदान | स्वयंसहायता गटांनी दरडोई रु.१.०० लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत, बँकेकडून घेतलेल्या व नियमीत कर्जफेड होत असलेल्या कर्जावरील ७% चे वरील व्याजाच्या रकमेसाठी अनुदान देण्यात येईल. |
| ६ | गटांच्या संघाची परिणामकारकता व टिकण्याची क्षमता यासाठी एकवार द्यावयाचा निधी | अ) गाव/ग्राम पंचायत स्तरावरील संघासाठी रु.१०,०००/-<br>ब) तालुका स्तरावरील संघासाठी रु.२०,०००/-<br>क) जिल्हा स्तरावरील संघासाठी रु.१,००,०००/- |
| ७ | व्यवस्थापकीय खर्च | एकूण नियतव्ययाच्या ५%. यातून राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय प्रशासकीय यंत्रणेचा खर्च भागविण्यात येईल. |
| ८ | मुलभूत सुविधा व विपणन | एकूण नियतव्ययाच्या २०% |
| ९ | रोजगार निर्मिती व नोकरी देणाऱ्या बाबींवरील प्रशिक्षण विशेष प्रकल्प आणि कार्यपध्दती | केंद्र शासनाच्या एकूण नियतव्ययाच्या २०% निधी यासाठी खर्च केला जाईल. मात्र, कार्यपध्दतीसाठी ५% पेक्षा जास्त खर्च यातून होणार नाही. यातील ७.५% निधी आंतरराज्य विशेष प्रकल्पासाठी राखून ठेवण्यात येईल व ७.५% निधी राज्यातील विशिष्ट विशेष प्रकल्प राबविण्यासाठी देण्यात येईल. |

६. **राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना** अंतर्गत खालीलप्रमाणे इतर व्यवस्था करण्यात येईल :-

### (i) Intensive Blocks मध्ये भांडवली अनुदान व त्याचे प्रोत्साहनुरुप वितरण -

"Intensive Blocks" मधील किमान १० ते १५ आप्तभाव असलेल्या स्वयंसहायता गटांचा (Affinity Based Self Help Groups) समावेश प्राथमिक संघात असेल व अशा संघाच्या माध्यमातून कामानुरुप आवश्यक निधी देण्यात येईल. त्यासाठी केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अटी व शर्तीचा समावेश केलेला आहे. या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर निधी वितरीत करण्यात येईल.

**(ii) अभियानाबाहेर असलेल्या तालुक्यांसाठी भांडवली अनुदानाचे वितरण-**

अभियान क्षेत्राबाहेरील तालुक्यांमध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना कार्य पध्दतीप्रमाणे अनुदान देण्यात येईल. मात्र प्रत्येक जिल्ह्यात ज्या पायलट ग्रामपंचायती असतील त्यामध्ये इंटेन्सिव्ह ब्लॉक मधील ग्रामपंचायतीप्रमाणेच सविस्तर प्रक्रिया राबविण्यात येईल.

**(iii) कर्जावरील व्याजदरासाठी अनुदान (Interest subsidy)-**

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचे आर्थिक उद्योगासाठी त्यांना परवडणारे कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी या अभियाना अंतर्गत व्याज दरावर अनुदान देण्यात येईल. **स्वयंसहायता बचत गटांना ७ टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल**. उर्वरित व्याजाचा भार केंद्र / राज्य शासन (७५:२५ या प्रमाणात ) घेईल.

**मात्र, भांडवली अनुदान प्राप्त होणाऱ्या गटांना कर्जाच्या व्याज दरासाठी अनुदानाचा लाभ देण्यात येणार नाही. थोडक्यात, एकाच कुटुंबस एकाच वेळी दोन प्रकारच्या अनुदानाचा लाभ मिळणार नाही. मात्र भांडवली अनुदानाचा वापर सामाजिक सुरक्षा व इतर अनुषंगिक बाबींसाठी करता येईल.**

**(iv) विशेष प्रकल्प -कौशल्यवृध्दी व नोकरी असलेले आणि नाविन्यपूर्ण विशेष प्रकल्प**

सद्य:स्थितीत स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजने अंतर्गत, योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सन २००५ पासून केंद्र शासनाने कौशल्यवृध्दी प्रशिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यातून विशेष प्रकल्प सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याच धर्तीवर या अभियानांतर्गतही राज्याच्या जिल्ह्यातून प्रकल्प तयार करुन७५:२५ या प्रमाणातील निधी पुरवठा होईल अशा तऱ्हेने केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात येतील.

**(v) अभियानामध्ये पंचायतराज संस्थेची भुमिका**

स्थानिक आर्थिक विकास व दारिद्रय निर्मुलनाद्वारे सामाजिक न्याय **याद्वारे** पंचायत राज संस्थांची घटनात्मक भूमिका आहे. लोकशाहीची मुळे रुजविण्यासाठी व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना सक्षम करण्यासाठी दारिद्रय रेषेखालील व्यक्तींच्या संस्था आणि पंचायत राज संस्थां यांच्यात परस्पर लाभदायक कामकाज व्हावे यासाठी ग्राम पंचायत स्तरावर जाणिवपूर्वक व्यवस्था करण्यात येईल व **पंचायतराज संस्था अभियानाच्या खालील बाबींमध्ये सक्रीय सहभाग घेतील :-**

**(अ)** स्वयंसहायीत गटातील दारिद्रय रेषेखालील विशेष तत्त्वांनुसार अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील व्यक्तींचे निश्चितीकरण करणे, त्यामध्ये प्रामुख्याने दुर्लक्षित आदिवासी घटक, दारिद्रय रेषेखालील व्यक्ती व कुटुंब प्रमुख असलेल्या महिला यांचा समावेश करण्यासाठी सहकार्य/मार्गदर्शन करणे.

**(ब)** गाव / ग्रामपंचायत / तालुकास्तर व इतर स्तरावर असलेल्या स्वयंसहायीत संघांना (फेडरेशन्सला)सुविधा उपलब्ध करुन देणे.

**(क)** स्वयंसहायीत गट आणि त्यांच्या संघांना वार्षिक योजना व कार्यामध्ये आवश्यक असलेल्या मागण्यांना प्राधान्य देणे

**(ड)** स्वयंसहायीत गटांच्या वतीने विविध विभाग व संस्था यांच्याशी समन्वय साधणे.

**(इ)** स्वयंसहायीत गट किंवा त्यांच्या संघांना लाभदायक ठरणारी कोणतीही कृती करणे.

**(फ) तसेच स्वयंसहायीत गट व त्यांचे ग्रामस्तरासह खालील जबाबदारी पार पाडतील -**

**(i)** ग्रामसभा व इतर सभेमध्ये सक्रीय सहभाग घेणे.

**(ii)** संनियंत्रणावर आधारीत संपूर्ण माहिती पुरविणे व पंचायत राज संस्थांच्या विकासात्मक कार्यक्रमाला पाठबळ देणे.

**(iii)** पंचायत राज संस्थांच्या आयोजनाविषयक कामांना व अंमलबजावणीस पाठबळ देणे.

**७. राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची संरचना व अंमलबजावणी व्यवस्थापन खालीलप्रमाणे असेल :-**

या अभियानामध्ये उत्क्रांतीमय गतीमानता आणि संस्थांची बांधणी, क्षमता बांधणी आणि कौशल्यवृध्दी आणि वित्तीय सेवेत प्रवेश, लघु उद्योजकांच्या उन्नतीसाठी मुलभूत सुविधा आणि विपणन सहाय, जबाबदारीपुर्ती कार्ये, अन्य योजनांच्या कार्याशी जुळणी इ.साठी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर संवेदनशील सहाय करणारे समर्पित घटक (Dedicated Units) खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येतील.

(i) महाराष्ट्र **'राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान'** स्थापन करण्यात येत आहे. हे अभियान राज्यशासनाच्या ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील व नियंत्रणाखाली राहील. या मंडळाची नोंदणी इंडियन सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० मधील तरतुदीनुसार करण्यात येईल. या राज्यस्तर अभियानाची संरचना **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविली आहे.

(ii) या कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेणे व अंमलबजावणी करणे यासाठी **परिशिष्ट-२** मध्ये दर्शविल्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय नियंत्रक संस्था व जिल्हास्तरीय कार्यकारी संस्था स्थापन करण्यात येत आहेत.

(iii) त्याचप्रमाणे पंचायत समिती स्तरावर याप्रयोजनासाठी **परिशिष्ट-३** मध्ये दर्शविल्यानुसार पंचायत समिती नियंत्रक संस्था व पंचायत समिती कार्यकारी संस्था स्थापन करण्यात येत आहेत.

या समित्यांची बैठक दर तिमाहीस अशी प्रत्येक आर्थिक वर्षात ४ वेळा होईल.

या समित्यांमध्ये काही सुधारणा/ बदल करावयाची आवश्यकता भासल्यास तशी सुधारणा/बदल करण्याचे अधिकार त्या त्या समितीस देण्यात येत आहेत.

(iv) सदर अभियान मीशन मोडमध्ये चालवावयाचे आहे. त्यासाठी या अभियान मंडळाची (SRLM) स्थापना करण्यात येत असून मंडळाची प्रशासकीय रचना **परिशिष्ट-४** मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल **.**

जिल्हास्तरावरील अभियान व्यवस्थापन युनिट व त्या खालील सर्व युनीट राज्य अभियानाचे सर्वसाधारण प्रशासकीय अधिपत्याखाली कार्यरत राहील.

(v) उपरोक्त मंडळ स्थापनेसाठी व त्यावर नियुक्ती देण्यासाठी सोबतच्या **परिशिष्ट-५** मधील खालील विवरणातील स्तंभ-२ मधील पदे निर्माण करण्यात येत आहेत. या पदांवर राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान मंडळाकडून स्तंभ -४ मधील अर्हता धारण करणारे अधिकारी /कर्मचारी

यांची स्तंभ-५ मधील वेतनावर / मानधनावर स्तंभ-३ मध्ये दर्शविलेल्या प्रकाराने नियुक्ती करण्यात येईल.

या पदांवर शासकीय, निमशासकीय, बँकींग इत्यादीकडून परसेवेवर कर्मचारी घेतल्यास वेतनावर नेमणूका देण्यात येतील तर कंत्राटी पध्दतीने आवश्यक कर्मचारी नियुक्त केल्यास त्यांना प्रतिमाह मानधन देण्यात येईल. कन्सलटंट पध्दतीने नेमणूका केल्यास त्यांना एकमूखी मोबदला पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल.

या पदावरील नियुक्त्यांचे अधिकार राज्य जीवनोन्नती अभियान मंडळास असतील. अभियानमंडळ अधिकार नियामक समिती/कार्यकारी समितीस प्रदान करु शकेल. जिल्ह्याचे आकारमान, गरज व विशेषज्ञांचा लौकिक यानुसार वेतन/ मानधनामध्ये बदल करण्यासाठी शासन स्तरावर ग्राम विकास विभाग सक्षम असेल.

८. एकूण नियतव्ययाच्या ५% निधी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रशासकीय क्षमतेवर खर्च करण्यात येईल. याशिवाय राज्य व जिल्हा स्तर प्रशासकीय खर्चासाठी जागतिक बँक प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्याला अतिरिक्त निधी उपलब्ध होईल.

९. यापुढील राज्य जीवनोन्नती अभियानाबाबतचे सर्व निर्णय/ अंमलबजावणीसाठीची कार्यवाही केंद्र शासनाच्या सुचनेनुसार / आदेशानुसार / वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यास ग्राम विकास व जलसंधारण विभाग सक्षम असेल.

१०. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांकरीता सहकार, महिला व बाल कल्याण, कृषि अशा विविध राज्य शासन विभागामार्फतही स्वयंसहायता गटांची निर्मिती करण्यात येते. राज्य जीवनोन्नती अभियानात इतर विभागामार्फत राबविण्यात येणारे बहुतांश घटक अंतर्भूत आहेत. विविध विभागांच्या स्वतंत्र अमलबजावणी प्रक्रीयेमुळे द्विरुक्तीकरण, अनावश्यक स्पर्धा अशी परिस्थिती राहू नये, विशेषतः दारिद्रय रेषेखालील कुटुंबे व त्यांच्या गटांचे उन्नतीकरण एका छत्राखाली व्हावे यासाठी राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान प्रभावीपणे राबविणेसाठी राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा एकमेव प्रकल्प असेल व इतर विभाग या प्रकल्पाशी त्यानुसार समन्वय करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७२६११४०५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
सचिव, ग्राम विकास विभाग

**सोबत :परिशिष्ट-१ ते ५**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,

सचिव, नियोजन/वित्त / सामाजिक न्याय/ आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/ सहकार/कृषि व पदुम/उद्योग, उर्जा व कामगार/ आरोग्य/ शालेय शिक्षण/ उच्च व तंत्र शिक्षण/ रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर (५ प्रतींसह)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा(प.), मुंबई.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
संचालक युनिसेफ/SIRD, पुणे/ जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
आयुक्त, इन्स्टीटयूशनल फायनन्स/ पाणलोट/ महिला व बाल विकास समिती.
अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
सह संचालक, एग्राविका कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, (५प्रतीसह)
निवडनस्ती

# परिशिष्ट - १

**(शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११ सोबतचे सहपत्र.)**

**१) राज्यस्तरीय सर्वसाधारण अभिकरण सभा(General Body) रचना :**

| | |
|---|---|
| मा.मुख्यमंत्री, | अध्यक्ष |
| मा.उपमुख्यमंत्री | सह अध्यक्ष |
| मा.मंत्री, ग्राम विकास, | उपाध्यक्ष |
| मा.मंत्री, कृषि, पशुसंवर्धन, जलसंधारण, कामगार, शिक्षण, उद्योग, महिला व बाल विकास, आरोग्य, वित्त, नियोजन, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, मा.राज्यमंत्री, ग्रामविकास | सदस्य |
| मुख्यसचिव | सदस्य |
| सचिव, कृषि, पशुसंवर्धन, जलसंधारण, कामगार, शिक्षण, उद्योग, महिला व बाल विकास, आरोग्य, वित्त, नियोजन, ग्राम विकास, सामाजिक न्याय, आदिवासी विकास,संचालक, एसआयआरडी, युनिसेफ, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक, व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, उपाध्यक्ष यांनी नियुक्त केलेले १ विभागीय आयुक्त, २ जिल्हा परिषद अध्यक्ष व २ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (पदसिध्द सदस्य) | सदस्य |
| ग्रामीण विकास मंत्रालय, केंद्र शासन/ प्रशिक्षण संस्था/व्यापार व औद्योगिक क्षेत्र, ॲकॅडमीक संस्था, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ग्रामीण विकासातील तज्ञ/ अशासकीय संस्था (३) | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (भारतीय प्रशासन सेवेतील वरीष्ठ अधिकारी | सदस्य सचिव |
| **समितीचे कार्य :-** राज्यस्तरावर राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत व त्याच्याशी संबंधित बाबींवरील धोरणात्मक निर्णय घेईल/ धोरण निश्चित करील. | |

**२) राज्यस्तरीय नियंत्रण समिती (Governing Body):**

| | |
|---|---|
| मा.मंत्री, ग्राम विकास | अध्यक्ष |
| मा.राज्यमंत्री, ग्राम विकास | सहअध्यक्ष |
| सचिव, कृषि, महिला व बाल विकास,वित्त, आदिवासी विकास, ग्राम विकास, पशुसंवर्धन, जलसंधारण, कामगार, शिक्षण, आरोग्य, नियोजन, सामाजिक न्याय, उद्योग. | सदस्य |

| | |
|---|---|
| आयुक्त, इन्स्टीटयूशनल फायनन्स, संचालक, पाणलोट अभियान, मुख्य व्यवस्थापक, नाबार्ड, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक, व्यापार व औद्योगिक संस्था यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| अध्यक्षांनी नियुक्त केलेले २ जिल्हा परिषद अध्यक्ष, २ पंचायत समिती सभापती, २ सरपंच व २ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (रोटेशन पध्दतीने) | सदस्य |
| उप सचिव (योजना), ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण जिवनोन्नती अभियान (भारतीय प्रशासन सेवेतील वरीष्ठ अधिकारी.) | सदस्य सचिव |
| **समितीचे कार्य :-** राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना संबंधी राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व नियमन करणे | |
| **३) राज्यस्तरीय कार्यकारी समिती (ExecutiveCommittee)** | |
| सचिव, ग्राम विकास | अध्यक्ष |
| सचिव, कृषि, नियोजन, पशुसंवर्धन, व्यय, वित्त, महिला व बाल विकास, सहकार व पणन, | सदस्य |
| उप सचिव (योजना), ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण जिवनोन्नती अभियान (भारतीय प्रशासन सेवेतील वरीष्ठ अधिकारी.) | सदस्य सचिव |
| **समितीचे कार्य :-** राज्य जीवनोन्नती अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे. | |

*-*-*-*-*-*

# परिशिष्ट - २

**(शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११ सोबतचे सहपत्र.)**

| | |
|---|---|
| **(ब ) जिल्हा स्तरावरील संस्थांत्मक संरचना** | |
| **१) जिल्हास्तरीय नियंत्रक संस्था (Governing Body):** | |
| अध्यक्ष, जिल्हा परिषद तथा नियामक मंडळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सहअध्यक्ष |
| सभापती, महिला व बाल विकास समिती, | सदस्य |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक नाबार्डचे प्रतिनिधी | सदस्य |
| स्वयंसहायता गटाच्या जिल्हा स्तरावरील संघातील दोन प्रतिनिधी | सदस्य |
| नावाजलेल्या २ अशासकीय संस्थेतील प्रतिनिधी | सदस्य |
| अभियानातील कार्यक्रम संचालक, | सदस्य सचिव |
| **२) जिल्हास्तरीय कार्यकारी संस्था (Executive Body) :** | |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | अध्यक्ष |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सहअध्यक्ष |
| ४ क्षेत्रातील विशेषज्ञ (बँकींग, सुक्ष्म पतपुरवठा, दारिद्रय निर्मूलन, कृषी, वित्त, पणन, मानवी संसाधन या क्षेत्रातील) | सदस्य |
| स्वयंसहायता गटाच्या जिल्हा स्तरावरील संघातील दोन प्रतिनिधी | सदस्य |
| अभियानातील कार्यक्रम संचालक, | सदस्य सचिव |

*-*-*-*-*-*

# परिशिष्ट - ३

**(शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः एनआरएलएम-२०११ /प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११ सोबतचे सहपत्र.)**

## (क) पंचायत समिती स्तरावरील संस्थांत्मक संरचना

**१) पंचायत समिती नियंत्रक संस्था (Governing Body):**

| | |
|---|---|
| सभापती, पंचायत समिती | अध्यक्ष |
| गट विकास अधिकारी, पंचायत समिती | सहअध्यक्ष |
| व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| स्वयंसहायता गटाच्या तालुका स्तरावरील संघातील दोन प्रतिनिधी | सदस्य |
| नावाजलेल्या २ अशासकीय संस्थेतील प्रतिनिधी | सदस्य |
| विस्तार अधिकारी, एग्रावियो, उद्योग | सदस्य |
| अभियानातील तालुका समन्वयक, | सदस्य सचिव |

**२) पंचायत समिती कार्यकारी संस्था (Executive Body) :**

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी, पंचायत समिती | अध्यक्ष |
| अभियानातील तालुका समन्वयक | सहअध्यक्ष |
| ४ क्षेत्रातील विशेषज्ञ | सदस्य |
| स्वयंसहायता गटाच्या जिल्हा स्तरावरील संघातील दोन प्रतिनिधी | सदस्य |
| विस्तार अधिकारी, एग्राविया | सदस्य |
| विस्तार अधिकारी, उद्योग | सदस्यसचिव |

*-*-*-*-*

# परिशिष्ट - ४

**(शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै , २०११ सोबतचे सहपत्र.)**

| | |
|---|---|
| **(i) राज्यस्तर** | राज्य अभियान महासंचालक (सचिव, ग्राम विकास विभाग) पदसिध्द |
| | राज्य अभियान संस्थेचे मुख्य कार्यकारीअधिकारी (भा.प्र.से.) |
| | एक अतिरिक्त संचालक |
| | दोन उप संचालक व ८ विशेषतज्ञ |
| | १ लघुलेखक, १ लिपीक-टंकलेखक व १ शिपाई |
| **(ii) जिल्हास्तर** | जिल्हा अभियान संचालक (मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरीषद) पदसिध्द |
| | सहजिल्हा अभियान संचालक (प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.) पदसिध्द |
| | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक |
| | ४ विशेषतज्ञ |
| | १ लघुलेखक-१ लिपीक-टंकलेखक व १ शिपाई |
| **(iii) तालुकास्तर** | तालुका कार्यक्रम व्यवस्थापक |
| | २ विस्तार अधिकारी |
| | ३ ते ४ विशेषज्ञ |
| **(iv) क्लस्टर स्तर** :- | संबंधित जिल्हयाच्या जिल्हापरिषद सदस्याच्या मतदार संघाच्या कार्यक्षेत्राइतका, सर्वसाधारणत: २५ ते ३० गावे मिळूनचा परिसर क्लस्टर म्हणून असेल व या परिसरासाठी एक क्लस्टर समन्वयक( Cluster Co- ordinator ) नियुक्त करण्यात येईल |

*-*-*-*-*-*-*

# परिशिष्ट - ५

**(शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/ योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११ सोबतचे सहपत्र.)**

| अ. क्र. | पदनाम | नियुक्तीचा प्रकार | अर्हता | वेतन/मानधन द.मा.रुपये पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (१ पद) | प्रतिनियुक्तीने | भारतीय प्रशासन सेवेतील मुख्य कार्यकारी अधिकारी/ जिल्हाधिकारी म्हणून काम केलेले जेष्ठ अधिकारी | १,००,०००/- |
| २ | अतिरिक्त संचालक (१ पद) | प्रतिनियुक्तीने | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अथवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरील जेष्ठ अधिकारी किंवा स्थात्तकोत्तर पदवी धारण करणारे, त्यांनी दारिद्र्य निर्मूलन क्षेत्रात किमान ५ वर्षे काम केलेले असावे. | ७५,०००/- |
| ३ | उप संचालक (२ पदे) | राज्य शासन किंवा राष्ट्रीयकृत बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने | उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरील जेष्ठ अधिकारी किंवा स्थात्तकोत्तर पदवी धारण करणारे, त्यांनी दारिद्र्य निर्मूलन क्षेत्रात किमान ५ वर्षे काम केलेले असावे. | ७०,०००/- |
| ४ | विशेषज्ञ/ (एकूण ८ पदे) | राज्य शासन / राष्ट्रीयकृत बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने अथवा Consultant स्वरुपात | कृषी, वित्त, पणन, मानवी संसाधन, दारिद्र्य निर्मूलन, सूक्ष्म पतपुरवठा, बँकींग जिवनोन्नती या क्षेत्रातील नामवंत तज्ञ | ६०,०००/- |
| ५ | जिल्हा अभियान संचालक | पदसिध्द | मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद व अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा काम पाहातील. | स्वतंत्र वेतनाची आवश्यकता नाही |
| ६ | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (District Programme Manager (१ पद) | राज्य शासन/ बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने अथवा Consultant स्वरुपात | राज्य शासन /बँकींग क्षेत्रात दारिद्र्य निर्मूलन जिवनोन्नती इ.क्षेत्रात किमान ६ वर्षे कामाचा अनुभवन | ६०,०००/- |
| ७ | विषय विशेषज्ञ (४ पदे) | बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राट पध्दतीने | कृषी, वित्त, पणन, मानवी संसाधन, दारिद्र्य निर्मूलन, जिवनोन्नती या क्षेत्रातील नामवंत तज्ञ | ६०,०००/- |
| ८ | तालुका कार्यक्रम व्यवस्थापक | राज्यशासन प्रतिनियुक्तीने अथवा कंत्राटी पध्दतीने | गट विकास अधिकारी, वर्ग-२, या पदावर / अथवा किमान ५ वर्षे सेवा बँकींग क्षेत्रातील केलेली असावी. | ५०,०००/- |
| ९ | विषय विशेषज्ञ (३ ते ४ पदे) | बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने | कृषी, वित्त, पणन, मानवी संसाधन, दारिद्र्य निर्मूलन, जिवनोन्नती या क्षेत्रातील नामवंत तज्ञ | ४०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | विस्तार अधिकारी | राज्य शासनाकडून अथवा बँकींग क्षेत्रातील प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने | वित्त,कृषी , जिवनोन्नती या विषयाशी संबंधित पदावर कार्यरत अथवा या क्षेत्रातील जाणकार | ३०,०००/- ते ५०,०००/- |
| ११ | लघुलेखक,लिपीक-टंकलेखक, शिपाई प्रत्येकी ३ अशी एकूण ९ पदे | राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने अथवा कंत्राटी पध्दतीने | राज्य शासनाच्या सर्वसाधारण सेवा भरती नियमानुसार निश्चित केलेली अर्हता धारक | अनुक्रमे १२,०००, १०,००० व ८,००० |
| १२ | Cluster Co-ordinator | खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने | MSW किंवा ग्रामीण विकासातील PGD किंवा स्नात्तकोत्तर पदवी धारण केलेले. | ४०,०००/- |

*-*-*-*-*-*